# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक : - २४ मे २०२५

---

जळगाव दि.२४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे पीएच.डी. प्रवेशाकरीता घेण्यात आलेल्या प्रवेशपुर्व परीक्षा २०२४ मधील उत्तीर्ण व सुट दिलेल्या विद्यार्थ्यांनमधुन ५८५ विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संमतीपत्रानुसार ४८७ संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक वाटपाची कार्यवाही दि. १९ ते २२ मे या कालावधीत करण्यात आली.

विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेल्या व विद्यापीठाच्या विद्यापरीषदेने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार विद्यापीठाने परिपत्रक ५८/२०२४ दि. ९ नोव्हेंबर २०२४ मध्ये पीएच.डी. प्रवेशासाठी निश्चित केलेली नियमावली, संशोधक मार्गदर्शकांची पात्रता व इतर प्रवेशासंदर्भातील सर्वकष माहिती नमुद करुन निर्गमित केले होते. या अनुषंगाने विद्यापीठाने २ ते ५ जानेवारी २०२५ या कालावधीत प्रवेशपुर्व परीक्षा २०२४ आयोजीत केली होती. त्यामध्ये उत्तीर्ण झालेल्या व सुट देण्यात आलेल्या संशोधकांना मार्गदर्शक उपलब्ध होण्यासाठी विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निकषानुसार माहे एप्रिल २०२५ मध्ये रिक्त जागा असलेल्या संशोधक मार्गदर्शकांची यादी जाहीर केली. या यादीमधुन संशोधक विद्यार्थ्यांनी संमती पत्र घेतलेले मार्गदर्शक वाटप प्रक्रिया १९ ते २२ मे या कालावधीत आयोजित करण्यात आली.

विद्यापीठाने जाहीर केलेल्या मार्गदर्शकाच्या यादीत विविध विद्याशाखेअंतर्गत पीएच.डी. प्रवेशासाठी ७८१ मार्गदर्शकांकडे २२९७ रिक्त जागा होत्या. पेट २०२४ मध्ये उत्तीर्ण झालेल्या ३०९ व सुट प्राप्त केलेल्या ५९३ अशा एकुण ९०२ विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शकांचे संमती पत्र सादर करणे करीता ही प्रक्रिया वरील कालावधीत आयोजित केली होती. परंतु प्रत्यक्षात ९०२ पैकी पेट परीक्षा उतीर्ण २४३ व सुट घेतलेल्या ३४२ अशा एकुण ५८५ विद्यार्थ्यांनी मार्गदर्शकांचे संमतीपत्र सादर केले.

त्यानुसार वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील मार्गदर्शकांकडील २०५ रिक्त जागांपैकी संमतीपत्र घेतलेल्या ६७ विद्यार्थ्यांमधुन पेट उत्तीर्ण २६ पैकी २२ विद्यार्थी व सुट मिळालेल्या ४३ पैकी ४१ अशा एकुण ६३ संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक निश्चित करण्यात आले.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील मार्गदर्शकांकडील १३६१ रिक्त जागांपैकी संमतीपत्र घेतलेल्या २९८ विद्यार्थ्यांमधुन पेट उत्तीर्ण १६० पैकी १४५ विद्यार्थी व सुट मिळालेल्या १३८ पैकी १२० विद्यार्थी अशा एकुण २६५ संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक निश्चित करण्यात आले.

मानवविज्ञान विद्याशाखेतील मार्गदर्शकांकडील ७१३ रिक्त जागांपैकी संमतीपत्र घेतलेल्या १७६ विद्यार्थ्यांमधुन पेट उत्तीर्ण ३९ पैकी ३३ विद्यार्थी व सुट मिळालेल्या १३७ पैकी १२१ अशा एकुण १५४ संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक निश्चित करण्यात आले.

आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतील मार्गदर्शकांकडील १८ रिक्त जागांकरीता संमतीपत्र घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी पेट उत्तीर्ण ०२ व सुट मिळालेल्या ०३ अशा एकुण ०५ संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक निश्चित करण्यात आले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.विनोद पाटील
कुलसचिव